मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरातील अतिक्रमणे व अनधिकृत नळ जोडण्यांवर कडक कारवाई करा

## आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे अधिकाऱ्यांना निर्देश; स्वच्छता, शिस्त आणि नागरिक सुविधांसाठी महापालिका ॲक्शन मोडमध्ये

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरात स्वच्छता आणि शिस्त राखण्यासाठी महानगरपालिका प्रशासन पूर्णपणे कटिबद्ध आहे. नागरिकांनीही जबाबदारीने वागून नियमांचे पालन करावे आणि घर खरेदी करताना बांधकामास अधिकृत परवानगी असल्याची खात्री करावी. अनधिकृत जाहिराती, अतिक्रमणे, बेकायदेशीर नळ जोडण्या तसेच परवानगीशिवाय सुरू असलेल्या बांधकामांवर अधिक तीव्र आणि कडक कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी प्रमुख अधिकारी व सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत अनधिकृत जाहिराती, अतिक्रमणे, बेकायदेशीर नळजोडण्या तसेच परवानगीशिवाय सुरू असलेल्या बांधकामांसंबधी आढावा बैठक घेऊन त्यांनी प्रशासनाला ॲक्शन मोडमध्ये काम करण्यास सांगितले. यावेळी ते बोलत होते.

दृकश्राव्य माध्यमाद्वारे झालेल्या या बैठकीत अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सचिन पवार, अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त अमित पंडित, किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, किशोर ननवरे, परशुराम वाघमोडे, राजाराम सरगर, अजिंक्य येळे, अश्विनी गायकवाड, पूजा दुधनाळे, निवेदिता घार्गे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते.

शहरात स्वच्छता राखण्यासाठी विशेष भर देण्यात येणार असून, भिंती, दूरध्वनी खांब आणि एम एस ई डीसीएल डीपीवर लावण्यात आलेले अनधिकृत बॅनर आणि जाहिरात फलक तात्काळ हटवण्याचे आदेश देण्यात आले आहेत तसेच, अशा फलकांवरील मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधून संबंधितांना नोटीस बजावण्याची कारवाईही करण्यात येणार आहे. अतिक्रमणमुक्त फुटपाथसाठी मोहीम तीव्र करावी पादचाऱ्यांना मोकळे आणि सुरक्षित मार्ग मिळावा यासाठी "अतिक्रमणमुक्त फुटपाथ" मोहिमेला गती देण्यात येत असून, विशेष पथके क्षेत्रीय स्तरावर कार्यरत राहणार आहेत.

अनधिकृत नळ कनेक्शनवर थेट कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. शहरातील बेकायदेशीर नळजोडण्या शोधून त्यावर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पाणी चोरी रोखण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. अनधिकृत बांधकामांवरही कठोर कारवाई करण्यात येईल त्यामध्ये परवानगीशिवाय सुरू असलेल्या बांधकामांवर महापालिका कडक कारवाई करणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

अनधिकृत बांधकामे महापालिका निष्कासित करणार आहे.त्यामुळे नागरिकांनी बांधकाम परवानगी नसलेल्या ठिकाणची सदनिका खरेदी करू नये. खरेदी करीत असलेले घर किंवा सदनिकेला अधिकृत बांधकाम परवानगी असल्याची खात्री करावी असे आवाहन आयुक्त डॉ विजय सुर्यवंशी यांनी केले आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६च्या पार्श्वभूमीवर कचरा संकलन, विलगीकरण आणि व्यवस्थापन यावर सखोल आढावा घेण्यात आला. पिंपरी चिंचवड शहराला देशात अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी सर्वांनी समन्वयाने प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले.

# पिंपरी-चिंचवडमधील सोसायटीधारकांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी फेडरेशन 'कटिबद्ध'

## पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघाची निवडणूक शांततेत; बिनविरोध निवडणूक करण्यासाठी दत्तात्रय देशमुख यांच्या मनाचा मोठेपणा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघाच्या व्यवस्थापन समितीची निवडणूक शांततेत व उत्साहात पार पडली. या निवडणुकीचा अधिकृत निकाल प्राधिकृत अधिकारी विलास लिंबळे यांनी जाहीर केला. विशेष म्हणजे, महासंघाचे मावळते अध्यक्ष दत्तात्रय देशमुख यांनी निवडणूक बिनविरोध करावी, असा संदेश अर्ज माघारी घेतला. मात्र, ११ जागासांठी १४ अर्ज असल्यामुळे मतदान घ्यावे लागले.



सोसायटी फेडरेशनच्या कमिटीसाठी निवडणूक सन 2026 ते 2031 या कालावधीसाठी घेण्यात आली. एकूण ११ सदस्यांची ही निवडणूक सर्वसाधारण मतदार संघातून घेण्यात आली असून, एकूण अधिकृत 27 मते पडली. यापैकी सर्व 27 मते वैध ठरली असून, एकही मत अवैध झाले नाही. रविवार, दि.26 एप्रिल 2026 रोजी सकाळी 10 वाजता विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीतच मतदान प्रक्रिया पूर्ण करून निकाल जाहीर करण्यात आला. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व नियमानुसार पूर्ण करण्यात आली.

### विजयी उमेदवारांची नावे

» **सचिन लोंढे, अरुण देशमुख, अधिकराव दिवे- पाटील, सचिन गुणाले,, विकास बाबर, प्रदीप घोरपडे, सचिन सिंध्ये, अजय तोडकर, रोहित सावंत, वैभव चौधरी, रोहित पाठक.**

या निवडणुकीत विविध सोसायटींच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. प्राधिकृत अधिकारी विलास लिंबळे यांनी निवडणुकीचा सविस्तर अहवाल व बैठकीचे इतिवृत्त संबंधित प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (3) यांच्याकडे सादर केले आहे. या निवडणुकीमुळे संस्थेच्या पुढील पाच वर्षांच्या कारभाराला नवे नेतृत्व मिळणार असून, सदस्यांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे

नवीन कार्यकारिणीमध्ये पदवाटप दोन-तीन दिवसांत करण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवडमधील सोसायटीधारकांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी फेडरेशन कटिबद्ध राहील, असा संकल्प नवनिर्वाचित सदस्यांनी केला आहे.

# पवना धरणातून गाळ काढण्यास प्रारंभ

## खासदार श्रीरंग बारणे यांचा पुढाकार; सलग दहाव्यावर्षी काढला जातोय गाळ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडकरांची तहान भागविणाऱ्या मावळातील पवना धरणातील पाणीसाठ्यात वाढ होण्याच्या उद्देशाने धरणातून गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. सलग दहाव्या वर्षी धरणातून गाळ काढण्यात येत असून, त्यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांनी पुढाकार घेतला आहे. शासनाचा कोणताही निधी न घेता लोकसहभागातून गाळ काढला जात आहे. गाळ काढल्याने धरणातील साठवण क्षमतेत वाढ झाली असून उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई जाणवत नाही.

पवना धरणातून गाळ काढण्याच्या कामाला रविवारपासून प्रारंभ करण्यात आला. यावेळी विधिवत पूजन करून मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते या उपक्रमाची सुरुवात झाली. खासदार बारणे यांनी गेल्या १० वर्षांपासून शासनाची कोणतीही आर्थिक मदत न घेता लोकसहभागातून हे गाळ काढण्याचे काम सातत्याने सुरू ठेवले आहे. यामुळे धरणातील पाणीसाठा वाढण्यास मदत होत असून, परिसरातील जलसंधारणाला बळ मिळत आहे. यंदाही पवना धरणातील जास्तीत जास्त गाळ काढून पाणीसाठ्यात वाढ करण्याचा उद्देश ठेवण्यात आला आहे. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख राजाभाऊ खांडभोर, मावळ तालुका प्रमुख राम सावंत, उपतालुका प्रमुख अमित कुंभार, सोमनाथ कोंडे, मदनभाऊ शेडगे, युवासेना जिल्हा प्रमुख सागर पाचरणे, उपजिल्हा प्रमुख दत्ताभाऊ केदारी, कामशेत शहर प्रमुख सतीश इंगवले, भगवान भिकोले, माजी सरपंच लाला गोंते, माजी उपसरपंच काळूभाऊ उंबरकर, अक्षय उंबरकर, भगवान दरेकर, बाळासाहेब दरेकर, एकनाथ दरेकर, अमित मोरे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या ५० वर्षांपासून पवना धरणातील गाळ काढला जात नव्हता. त्यामुळे पाणी साठण्यास अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे गेल्या नऊ वर्षांपासून धरणातील गाळ काढण्यास सुरुवात केली. परिणामी, धरणातील पाणीसाठ्यात वाढ झाली. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जाऊ लागले नाही. उन्हाळ्यात देखील पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध होत असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले. पावसाळा सुरू होईपर्यंत गाळ काढण्याचे काम चालू राहणार आहे.

खासदार बारणे म्हणाले, पवना धरणातून पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा होतो. या धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साठला जातो. त्यामुळे पाणीसाठ्यात अडथळा निर्माण होतो. परिणामी पाणीटंचाईच्या समस्येला सामोरे जाण्याची वेळ येते. धरणातून गाळ काढण्याला सुरुवात करण्यापूर्वी पिंपरी-चिंचवड शहराला दोन दिवसाआड पाणी मिळत होते. पाण्याची मोठी टंचाई जाणवत होती. त्यामुळे मागील नऊ वर्षांपासून दरवर्षी उन्हाळ्यात धरणातील गाळ काढण्यात येत आहे. आत्तापर्यंत ८५ हजार क्युबिक मीटर गाळ धरणातून काढला आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. त्यामुळे उन्हाळ्यातही तीव्र पाणीटंचाई जाणवत नाही.



### पिंपरी-चिंचवडला मोठा दिलासा

» पवना धरणातून पिंपरी-चिंचवड शहराला मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा केला जातो. गेल्या काही वर्षांत धरणातून सुमारे ८५ हजार क्युबिक मीटर गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठ्यात वाढ झाली असून उन्हाळ्यातही तीव्र टंचाई जाणवत नाही. पूर्वी शहराला दोन दिवसाआड पाणी मिळत होते, मात्र आता परिस्थितीत सुधारणा झाल्याचे सांगितले जात आहे.

### गाळातून गुलाब शेतीही फुलली..

» पवना धरणातील काढलेला गाळ मावळातील शेतकऱ्यांना निशुल्क दिला जातो. मावळ तालुक्यातून मोठ्या प्रमाणात गुलाबाची जगात निर्यात केली जाते. गुलाब शेतकऱ्यांना पोयटा मातीचा फायदा होतो. त्यामुळे गुलाबाच्या उत्पन्नात भर पडते. गुलाबाच्या शेतीतही वाढ झाली. पाणीसाठवण क्षमताही वाढली आणि गुलाबाची शेतीही फुलल्याने नागरिकांना दुहेरी फायदा होत आहे. त्यामुळे स्थानिकांनी खासदार श्रीरंग बारणे यांचे आभार मानले आहेत.

### सलग दहाव्या वर्षी उपक्रम

» पवना धरणातील गाळ काढण्याच्या कामाला यंदा पुन्हा सुरुवात झाली असून हा उपक्रम सलग दहाव्या वर्षी राबविला जात आहे. खासदार श्रीरंग बारणे यांच्या पुढाकारातून शासनाचा निधी न घेता लोकसहभागातून हे काम केले जात आहे. धरणातील गाळ कमी झाल्याने साठवण क्षमता वाढते आणि भविष्यातील पाणीटंचाई कमी करण्यास मदत होते. पावसाळा सुरू होईपर्यंत गाळ काढण्याचे काम सुरू राहणार आहे.

# 28 एप्रिलला पिंपरी चिंचवड शहरातील सायंकाळचा पाणीपुरवठा राहणार बंद

## निगडी जलशुद्धीकरण केंद्र येथे करण्यात येणाऱ्या स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल-दुरुस्तीच्या कामामुळे पाणीपुरवठा बंद राहणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने निगडी जलशुद्धीकरण केंद्र येथे करण्यात येणाऱ्या स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल-दुरुस्तीच्या कामामुळे उद्या मंगळवार, दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी पिंपरी चिंचवड शहरातील सर्व भागांचा सायंकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तसेच दुसऱ्या दिवशी म्हणजेच बुधवार, दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होईल. तरी नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा पुरेसा साठा करून काटकसरीने वापर करून सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

पिंपरी चिंचवड शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये खंड पडू नये, यासाठी वेळोवेळी पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असते. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत से.क्र.२३ येथील तसेच क्षेत्रीय स्तरावरील स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल-दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

या कामांसाठी २८ एप्रिल २०२६ रोजी निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरून होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे २८ एप्रिलला पिंपरी चिंचवड शहरातील सर्व भागांचा सायंकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार असून २९ एप्रिलला सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होईल.




> निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरील देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी २८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी पाणीपुरवठा बंद राहणार असल्याने नागरिकांनी आवश्यकतेनुसार पाण्याचा पुरेसा साठा करून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व नियोजनबद्ध वापर करून सहकार्य करावे. देखभाल-दुरुस्तीची सर्व कामे निर्धारित वेळेत पूर्ण करून पाणीपुरवठा पूर्ववत सुरळीत करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन प्रयत्नशील राहील.
>
> **- प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# भूसंपादन प्रक्रियेत पारदर्शकतेसाठी मुख्यसभेत ठोस पाऊल

## रस्ते रुंदीकरणासाठी किती प्रस्ताव, किती रक्कम भरली याचा तपशील नसल्याचे उघड; महिनाभरात अहवाल सादर करण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील रस्ते रुंदीकरण तसेच वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी भूसंपादन करण्यासाठी महापालिकेने जिल्हाधिकाऱ्यांकडे किती प्रस्ताव पाठविले आहेत, तसेच भूसंपादनासाठी किती रक्कम भरली याची माहितीच प्रशासनाकडे नसल्याचे शुक्रवारच्या मुख्यसभेत उघडकीस आले. त्यामुळे, नगरसेवकांनी चांगलाच संताप व्यक्त केल असून याचा अहवाल महिन्यात मुख्यसभेत ठेवण्याची मागणी नगरसेवकांनी केली आहे.

महापालिकेकडून २०१८ मध्ये काही प्रकल्पांच्या विकास आराखड्यात प्रस्तावित आरक्षणांच्या जागा ताब्यात घेण्यासाठी जागा मालकांनी दिलेल्या पर्चेस नोटीसच्या अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही करण्याचे प्रस्ताव मुख्यसभेत ठेवले होते. सहा वर्षांपासून हे प्रस्ताव पुढे ढकलले जात आहेत. दुसरीकडे पर्चेस नोटीस पूर्वीच भूसंपादनाची कार्यवाही सुरू झाल्याचे समोर आले आहे.




### नगरसेवकांचा सवाल

» काँग्रेसचे नगरसेवक अरविंद शिंदे, विरोधीपक्ष नेते निलेश निकम, तसेच इतर सदस्यांनी प्रशासनाकडे सविस्तर माहितीची मागणी केली. उपायुक्तांनी खुलासा करण्याचा प्रयत्न केला, मात्र समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. सभागृहनेते गणेश बिडकर यांनीही प्रशासनाने अचूक माहिती देण्याच्या सूचना केल्या. त्यामुळे सभागृहात प्रशासनाला कोंडीत पकडण्यात आले.

त्यामुळे हे प्रस्ताव मागे घेण्याचे पत्र आयुक्तांनी दिले होते. त्यावरील चर्चेत ही बाब समोर आली आहे. हा प्रस्ताव मान्यतेसाठी आल्यानंतर काँग्रेसचे नगरसेवक अरविंद शिंदे तसेच विरोधीपक्ष नेते निलेश निकम यांनी संबंधित प्रस्तावाची माहिती मागितली. त्यावेळी उपायुक्त निखील मोरे यांनी खुलासा केला. मात्र, त्यांना समाधानकारक उत्तरे देता न आल्याने या दोन्ही नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली.

सभागृहनेते गणेश बिडकर यांनीही प्रशासनाला योग्य माहिती देण्याच्या सूचना केल्या. नगरसेविका रेखा टिंगरे आणि अनिल टिंगरे यांनीही त्यांच्या परिसरातील नागरिकांना अद्यापही रस्त्याच्या भूसंपादनाचा मोबदला मिळाला नसल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यानंतर, नगरसेवक दिलीप वेडेपाटील यांनी महापालिकेस भूसंपादनासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव दाखल केल्यानंतर त्यासाठी भूसंपादन रकमेच्या ३० टक्के जिल्हाधिकाऱ्यांकडे भरावी लागते.

आता पर्यंत किती रक्कम भरली आहे.याची माहिती विचारली. मात्र, अधिकाऱ्यांनी ही माहिती उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. त्यावरून या सर्व नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली. तसेच याचा अहवाल पुढील महिन्याच्या मुख्यसभेत सादर करण्याची मागणी केली.

### माहितीअभावी गोंधळ

» महापालिकेने शहरातील रस्ते रुंदीकरण व विविध प्रकल्पांसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे किती भूसंपादन प्रस्ताव पाठविले, याची स्पष्ट माहिती प्रशासनाकडे नसल्याचे मुख्यसभेत समोर आले. तसेच भूसंपादनासाठी किती रक्कम जमा करण्यात आली, याचाही तपशील उपलब्ध नव्हता. या प्रकारामुळे नगरसेवकांनी प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली. महत्त्वाच्या विषयात माहितीअभावी कारभार चालत असल्याचा आरोप करण्यात आला.

### मोबदल्याचा मुद्दा

» नगरसेविका रेखा टिंगरे व अनिल टिंगरे यांनी त्यांच्या भागातील नागरिकांना भूसंपादनाचा मोबदला अद्याप न मिळाल्याची बाब मांडली. नगरसेवक दिलीप वेडेपाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे ३० टक्के रक्कम जमा केल्याबाबत माहिती विचारली. मात्र, अधिकाऱ्यांकडे याचाही तपशील नव्हता. त्यामुळे सर्व सदस्यांनी पुढील महिन्यात सविस्तर अहवाल सादर करण्याची मागणी केली.

# पुरंदर विमानतळ भूसंपादनाला येणार वेग; राज्य सरकारची 6 हजार कोटींच्या कर्जाला 'थकहमी'

## पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी भूसंपादनापोटी 6 हजार कोटी रुपयांच्या कर्जाला राज्य सरकारची थकहमी मिळाली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी आवश्यक भूसंपादनापोटी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला ६ हजार कोटी रुपयांच्या कर्जाची थकहमी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शासनाच्या या निर्णयामुळे भूसंपादनासाठी आवश्यक असणाऱ्या जमिनीच्या दरांबाबत निर्णय घेता येणार असल्याने शेतकऱ्यांना लवकरच मोबदला मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सुमारे ३ हजार एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे. यासाठी राज्य सरकारने १० फेब्रुवारी रोजी ६ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास मान्यता देण्यात दिली होती. हे विमानतळ बांधण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एसआयडीसी), महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी), शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए)



या संस्थांची मिळून एक विशेष कंपनी स्थापन करण्याचा निर्णय या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता. जिल्हा प्रशासनाने ही जागा संपादित करून एमआयडीसीकडे सुपूर्त करावी, असे ठरले आहे. त्यानुसार मंत्रिमंडळाने या भूसंपादनाच्या निधीसाठी एमआयडीसीला प्राधिकृत केले आहे. एमआयडीसीला हुडको किंवा तत्सम इतर वित्तीय संस्थांकडूनसुद्धा हे कर्ज घेण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

शासन निर्णयानुसार या ६ हजार कोटी रुपयांच्या कर्जाला थकहमी देण्याचा निर्णय घेतला आहे. हे कर्ज फेडताना सर्वाधिक ५१ टक्के वाटा सिडकोचा असला तरी प्रमुख कर्जदार म्हणून एमआयडीसीची नेमणूक करण्यात आली आहे. मात्र, कर्ज फेडताना एमआयडीसी १५ टक्के, एमआयडीसी १९ टक्के, सिडको ५१ टक्के तर पीएमआरडीए १५ टक्के वाटा उचलणार आहे.

राज्य सरकारने दिलेली थकहमी शासन निर्णय जारी झाल्यानंतर वर्षभरासाठीच असणार आहे. त्यामुळे एमआयडीसीला तातडीने कर्ज घेऊन ते जिल्हा प्रशासनाला मोबदला वितरण करण्यासाठी द्यावे लागणार आहे.

### मोबदल्याला गती

» पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी राज्य सरकारने ६ हजार कोटी रुपयांच्या कर्जाला थकहमी दिल्याने भूसंपादन प्रक्रियेला मोठी चालना मिळाली आहे. या निर्णयामुळे जमीनदर निश्चिती करून शेतकऱ्यांना लवकर मोबदला देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सुमारे ३ हजार एकर जमीन संपादित केली जाणार असून जिल्हा प्रशासनाला निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. एमआयडीसी प्रमुख कर्जदार म्हणून ही जबाबदारी सांभाळणार आहे. शासनाच्या निर्णयामुळे विमानतळ प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांना वेग मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# पीएमपी बस पळविणाऱ्या तरुणाविरुद्ध अखेर गुन्हा दाखल

## पुणे महापालिका भवन परिसरातून पीएमपी बस पळवून नेणाऱ्या तरुणाला पोलिसांनी गोखले स्मारक चौकात अडवले आरोपीवर गुन्हा दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका भवन परिसरातून पीएमपी बस पळवून नेणाऱ्या तरुणाविरुद्ध शिवाजीनगर पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी एका २० वर्षीय तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो मूळचा उत्तराखंडमधील गढवाल भागातील घटासरी गावचा रहिवासी आहे. याबाबत पीएमपीचे पर्यवेक्षक (चालक विभाग) ऋषीकेश मुटके (वय २८) यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

आरोपी तरुणाविरुद्ध चोरी करणे, तसेच मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महापालिका भवन परिसरातून एका तरुणाने पीएमपी बस पळवून नेल्याची घटना शनिवारी (२५ एप्रिल) घडली. जंगली महाराज रस्त्यावरून गोखले रस्त्यापर्यंत आलेली ही बस पोलिसांनी प्रसंगावधान राखून थांबवली. पोलिसांच्या प्रसंगावधानामुळे अनर्थ टळला.

पोलिसांनी चौकशी केली. उत्तराखंडमधील तरुणाच्या आईशी संपर्क साधण्यात आला. तरुण मूळचा पुण्यात कसा आला, याबाबतची माहिती त्याच्या आईला नाही. पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर तरुण सतत बोलत होता. त्याचे वर्तन पाहता पोलिसांनी त्याला ससून रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय तज्ज्ञांकडून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. त्याचे मानसिक संतुलन बिघडल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

पीएमपीच्या स्टेअरिंगजवळ लावलेली चावी चालक विसरून गेला. ती पाहून तेथून निघालेल्या तरुणाने त्या चावीने बस सुरू केली आणि महापालिका भवन, जंगली महाराज रस्त्यावरून बस नामदार गोपाळ कृष्ण गोखले (फर्ग्युसन रस्ता) रस्त्यापर्यंत नेली. त्या वेळी गोखले स्मारक चौकात एक कार्यक्रम सुरू होता. पीएमपी बस पळवून नेल्याची माहिती मिळाल्यानंतर गोखले स्मारक चौकात बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांनी प्रसंगावधान राखून बस अडविली.

बस चोरी करुन नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण होईल, असे कृत्य केल्याप्रकरणी आरोपी तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीषकुमार दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रमोद पाटील तपास करत आहेत. दरम्यान, पोलिसांनी उत्तराखंडमधील तरुणाच्या आईशी संपर्क साधला.

तरुण पुण्यात कसा आला, याबाबतची माहिती त्याच्या आईला नाही. पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर तरुण सतत बोलत होता. त्याचे वर्तन पाहता पोलिसांनी त्याला ससून रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय तज्ज्ञांकडून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. त्याचे मानसिक संतुलन बिघडल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली



### चावी विसरल्याने प्रकार घडला

**» पीएमपी चालक स्टेअरिंगजवळ बसची चावी विसरून गेला होता. हीच संधी साधून तरुणाने बस सुरू केली आणि ती थेट शहरातील गर्दीच्या रस्त्यावर नेली. निष्काळजीपणामुळे गंभीर घटना घडू शकली असती. या प्रकरणानंतर पीएमपी प्रशासनाने चालकांनी वाहन सोडताना सर्व नियम काटेकोरपणे पाळावेत, अशा सूचना देण्याची गरज व्यक्त होत आहे.**

### पोलिसांची सतर्कता

**» महापालिका भवन परिसरातून पीएमपी बस पळवून नेल्याची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलिसांनी तातडीने हालचाल केली. बस जंगली महाराज रस्त्यावरून गोखले रस्त्याकडे जात असल्याचे समजताच बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांनी गोखले स्मारक चौकात बस अडवली. वेळेत कारवाई झाल्यामुळे मोठा अपघात किंवा जीवितहानी टळली. या प्रसंगावधानामुळे पोलिसांचे कौतुक होत आहे.**

### आरोपीवर गुन्हा दाखल

**» या प्रकरणी २० वर्षीय तरुणाविरुद्ध चोरी आणि मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी मूळचा उत्तराखंडमधील असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी त्याच्या कुटुंबीयांशी संपर्क साधला असून चौकशी सुरू आहे. ताब्यात घेतल्यानंतर त्याचे वर्तन संशयास्पद वाटल्याने त्याला ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.**

# पनीरप्रेमी पुणेकरांना दिलासा; पनीरची शुद्धता आता कायद्याच्या कक्षेत

## 1 मेपासून 'चीज ॲनालॉग'चा उल्लेख करणे हॉटेल आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांना सक्तीचे...

**पुणे | प्रतिनिधी**

हॉटेलमध्ये गेल्यावर पनीरच्या विविध पदार्थांवर ताव मारणे हा खवय्ये असलेल्या पुणेकरांच्या अतिशय जिव्हाळ्याचा विषय. पण आपल्या प्लेटमधील पनीर अस्सल आहे की बनावट, हे कळत नव्हते. मात्र आता हॉटेलमध्ये तुम्हाला देण्यात आलेले पनीर खरोखर दुधापासून बनलेले नैसर्गिक पनीर आहे की स्वस्त वनस्पती तेलापासून तयार केलेले बनावट पनीर, या प्रश्नाचे उत्तर आता प्रत्येक हॉटेल चालकाला अधिकृतपणे द्यावे लागणार आहे. ग्राहकांना दिशाभूल करणाऱ्या अन्नविषयक पद्धतींपासून वाचवण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासनाने (एफडीए) कठोर आदेश जारी केली आहेत. यानुसार हॉटेल्स आणि खाद्य विक्रेत्यांना ते खरे पनीर देत आहेत की त्याचे पर्याय, हे स्पष्टपणे जाहीर करणे आता १ मेपासून बंधनकारक आहे.

पनीरच्या नावाखाली होणारी ग्राहकांची फसवणूक थांबवण्यासाठी राज्य सरकारने 'चीज ॲनालॉग'च्या वापराबाबत कठोर नियमावली जाहीर केली असून, आता महाराष्ट्राचा हा पॅटर्न केंद्र सरकारने स्वीकारल्याने तो देशभर लागू होणार आहे. गेल्या काही वर्षांपासून रेस्टॉरंट्स, फास्ट फूड सेंटर्स आणि केटरर्समध्ये पनीरच्या जागी 'चीज ॲनालॉग'चा वापर मोठ्या प्रमाणात वाढला होता. हे उत्पादन दिसायला, कापायला आणि चवीला अगदी पनीरसारखेच असते, परंतु ते दुधापासून बनवलेले नसते. स्वस्त दरात उपलब्ध होत असल्यामुळे अनेक व्यावसायिक नफा वाढवण्यासाठी ग्राहकांना न सांगता याचा वापर करत होते २१ एप्रिल रोजी केंद्राने एक परिपत्रक काढून १ मे पासून हा नियम संपूर्ण देशभर लागू करण्यास मान्यता दिली. यामुळे आता पनीरमधील भेसळ आणि फसवणुकीविरुद्धची मोहीम देशव्यापी झाली आहे..



### बिलावरही उल्लेख करणे आवश्यक

**» तसेच, प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, केवळ तोंडी सांगून किंवा मेन्यूकार्डच्या कोपऱ्यात बारीक अक्षरात लिहून भागणार नाही. नवीन नियमांनुसार, प्रत्येक पदार्थाच्या समोर तो पनीरपासून बनला आहे की ॲनालॉगपासून, हे स्पष्ट लिहावे लागेल. हॉटेलमधील डिजिटल किंवा साध्या सूचना फलकांवर याची माहिती देणे अनिवार्य असणार आहे. यासोबतच, ग्राहकाला मिळणाऱ्या बिलावरदेखील संबंधित पदार्थ 'ॲनालॉग' वापरून बनवला असल्याची नोंद असावी लागेल.**